# मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षणविभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), दुसरा मजला,
मांडली तलाव, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे - ४०१ १०१.


जा.क्र. मनपा/शिक्षण/५११ /२०२४-२५

दिनांक ११ /०७/२०२४

प्रति,
सिस्टिम मॅनेजर
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय -नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी वसतीगृहतील विदयार्थ्यांच्या प्रवेशासाठी स्थनिक वर्तमानपत्रात व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहीरात प्रसिध्द करणे बाबत .

संदर्भ- मा.आयुक्त तथा प्रशासक सो मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजुर टिपणी दि.०५/०७/२०२४

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की मिरा भाईंदर कार्यक्षेत्रात समग्र शिक्षा अंतर्गत मनपा शाळा क्रमांक १० चेने येथे ५० अनाथ्, बेघर,विखुरलेल्या वाडया, वस्त्या माता पित्यांचे संरक्षण नसलेले बालके, रस्त्यावर, रेल्वे स्थानकावर राहणारी तसेच दुर्बल वंचित गटातील विशेषत: शहरी भागातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांसाठी नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी वसतीगृहात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी प्रवेश दयावयाची प्रक्रिया सुरु आहे.

सदर निवासी वसतीगृहात विदयार्थ्यांच्या प्रवेशाबाबत जनजागृती करणे करिता स्थनिक वर्तमानपत्रात व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहीरात प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत जाहीरात जोडण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी
शिक्षण विभाग
मिरा भाईंदरमहानगरपालिका

माहीतीस्तव – 1. मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका
2.मा.अतिरिक्त आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका
3.मा. उपायुक्त ( शिक्षण)मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

प्रवेश देणे सुरु आहे

प्रवेश देणे सुरु आहे

**मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग**
**समग्र शिक्षा, नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी वसतीगृह**
**शैक्षणिक वर्ष २०२४-२५**

# प्रवेश देणे सुरु आहे

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील समग्र शिक्षा अंतर्गत मनपा शाळा क्र. १०,चेणे मराठी येथे ५० अनाथ,बेघर विखुरलेल्या वाडया, वस्त्या माता पित्यांचे संरक्षण नसलेले बालके,रस्त्यावर,रेल्वे स्थानकावर राहणारी, तसेच दुर्बल वंचित गटातील विषेशत: शहरी भागातील ०६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकासाठी निवासी वसतीगृहात प्रवेश द्यावयाचे आहे. तरी मनपा शाळा क्र.१० चेणेगाव,घोडबंदर रोड ता.जि.ठाणे येथे कार्यालयीन वेळेत गरजु पालकांनी गृहप्रमुख यांच्याशी संपर्क साधावा.

## प्रवेशासाठी पात्र

१) अनाथ, बेघर मुलांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येईल.
२) जेथे शिक्षणाची सोय उपलब्ध नाही अशा एकाकी खेडे वस्त्यातील मुलांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येईल, आई किंवा वडील हयात नसलेल्या आणि या संदर्भात पालकत्व इतर व्यक्तिकडे असलेल्या मुलांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येईल, घटस्पोटीत किंवा परितक्तेच्या मुलांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येईल.
३) शारीरिक अपंगत्वामुळे अक्षम असलेल्या पालकांच्या मुलांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येईल.
४) नैसर्गिक आपत्तीग्रस्त पालकांच्या मुलांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येईल.
५) एकच पालक हयात असल्यास (आई किंवा वडील) त्यांच्या पाल्यांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येईल.
६) विशेषत: उच्च प्राथमिक शिक्षण पुर्ण करण्यासाठी पौगंडावस्थेतील ज्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध नाही. अशा मुलांना प्रवेश देण्यात येईल.

प्रवेश देण्याचे व नाकारण्याचे सर्वस्वी अधिकार निवासी वसतीगृह प्रवेश समितीकडे आहे.

(अनिल मोरे)
गृहप्रमुख-नि-अधिक्षक
सदस्य-सचिव
निवासी वसतीगृह प्रवेश समिती
मो.क्र. ९८३४६०४५६६

(सोनाली मातेकर)
शिक्षणाधिकारी, तथा अध्यक्ष
निवासी वसतीगृह प्रवेश समिती

Scanned with OKEN Scanner